RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ५७(१४)] बुधवार, मे ४, २०२२/वैशाख १४, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक ४ मे, २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीडब्ल्यूआर-३२०/प्र.क्र.६८ (भाग-१)/(२)/राउशु-३.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३, मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे, पूर्व प्रसिध्दीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (च) आणि (ज१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

**१.** या नियमांना, "मुंबई विदेशी मद्य (दुसरी सुधारणा) नियम, २०२२" असे संबोधण्यात यावे.

**२.** मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ (यात यापुढे ज्याचा "प्रधान नियम" असा निर्देश करण्यात आला आहे.) च्या नियम ३ मधील उप-नियम (७-अ), च्या ऐवजी खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावा.

"(७-अ) "ग्राउलर" म्हणजे एक लिटर पेक्षा जास्त पण पाच लिटर पेक्षा कमी अशा योग्य खाद्य पदार्थाच्या दर्जाची बरणी किंवा पात्र ज्यात मायक्रोब्रुव्हरी किंवा खाद्यगृह-ब्रुव्हरी किंवा वाईनरी अनुज्ञप्तीधारकाकडून पिंपात प्राप्त झालेली, मागणीनुसार अनुज्ञप्तीच्या जागेत भरुन तात्पुरत्या स्वरुपात सीलबंद केलेली".

**३.** प्रधान नियमातील नियम २५ ब मध्ये,—

(एक) उप-नियम (१) मध्ये "अनुज्ञप्ती धारण करणारी कोणतीही व्यक्ती" या शब्दांपासून सुरु झालेला आणि "अनुज्ञप्ती परिसरात सीलबंद बाटली" या शब्दासह समाप्त झालेल्या भागाऐवजी खालील मजकूर समाविष्ट करावा.

" वाईन किरकोळ स्वरुपात विकण्याची इच्छा असणारी कोणतीही व्यक्ती, अनुज्ञप्ती परिसरात सीलबंद बाटलीतून किंवा ग्राऊलरमधून क्राफ्ट वाईन"

(दोन) उप-नियम (२) मध्ये,—

(अ) "शासनाच्या पूर्व मान्यतेने" हे शब्द वगळण्यात येत आहेत.

(ब) दोन्ही परंतुके वगळण्यात येत आहेत.

**४.** प्रधान नियमातील नियम ३० मध्ये दुसऱ्या परंतुकाऐवजी खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे,—

"परंतु, नमुना एफएल/बीआर-२ आणि एफएल/डब्ल्यु-२ अनुज्ञप्ती अंतर्गत परवानगीनुसार विक्रीसाठी आवश्यक असणारी बीअर, मीड वाईन आणि क्राफ्ट वाईन, केवळ ५ लिटर पेक्षा कमी नसलेल्या सीलबंद स्वरुपात, उत्पादन शुल्क भरल्यानंतर अधिकृत नमुना बीआर-९ वाहतूक पासखाली परिस्थितीनुसार, मायक्रोब्रुअरी, खाद्यगृह-ब्रुवरी किंवा क्राफ्ट वाईनरी अनुज्ञप्तीमधून थेट घेऊ शकेल.".

**५.** प्रधान नियमातील नियम, ४८अे मध्ये खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे,—

"परंतु, एखाद्या क्लब किंवा अशी एखादी संस्था किंवा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या कंपनीच्या सचिवास किंवा अशा क्लब किंवा संस्था किंवा कंपनीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही वाईन फेस्टीव्हल किंवा सणासाठी तात्पुरत्या स्वरुपात फक्त वाईन विक्री करण्याचा हेतू असल्यास, जागेची नोंदणी करण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.".

**६.** प्रधान नियमातील नियम, ४८डी मध्ये खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे,—

"परंतु, नियम ४८अे मधील तरतूदींनुसार नोंदणीकृत नसलेल्या कोणत्याही जागेसाठी, अशा प्रत्येक वाईन फेस्टीव्हल किंवा सणासाठी त्यांच्या वतीने तात्पूरत्या परवान्यासाठी अर्ज करु शकतात.".

**७.** प्रधान नियमांशी जोडलेल्या नमूना एफएलए-आयएफ मधील परिच्छेद ३ मध्ये अ.क्र. (डी) नंतर खालील नोंद समाविष्ट करण्यात येत आहे,—

| | |
|---|---|
| "( ई ) वाईन फेस्टीव्हल | वाईन चाखणे आणि रसग्रहण कार्यक्रम." |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the 4th May, 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BWR-320/C.R.68 (Part-1)/(2)/EXC-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*f*) and (*h1*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, namely :—

**1.** These rules may be called the Bombay Foreign Liquor (Second Amendment) Rules, 2022.

**2.** In rule 3 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (hereinafter referred to as “the principal Rules”), the sub-rule (*7-a*), shall be substituted, namely :—

“(*7-a*) “Growler” means a jar or container of at least one litre but not more than 5 litre made of any suitable food grade material to be filled on-premise on order from kegs received from microbrewery or a restaurant-brewery or winery license holders and can be sealed temporarily.”.

**3.** In rule 25B of the principal Rules,—

(*i*) in sub-rule (*1*), of the portion beginning with the words, “Any person holding a licence” and ending with the words, “sealed bottle in the licensed premises”, the following shall be substituted, namely :—

“Any person desiring to sell wine by retail, in sealed bottle or craft wine in Growlers in the licensed premises”.

(*ii*) in sub-rule (2),—

(*a*) the words “with the previous sanction of the State Government” shall be deleted ;

(*b*) both the provisos shall be deleted.

**4.** In rule 30 of the principal Rules, for the second proviso, the following proviso shall be substituted, namely,—

“Provided further that, beer, mead wine and craft wine, as permitted, required for sell under Form FL/BR-II and FL/W-II licence, may be obtained directly from a microbrewery or restaurant-brewery or craft winery licence, as the case may be, only in packaged form of not less than 5 litres, after payment of excise duty under a valid transport pass in Form BR-IX.”.

**5.** In rule 48A of the principal rules, the following proviso shall be added, namely,—

“Provided that, the secretary of any club or any such institution or event management company or any person authorized by the club or institution or company shall, if it is intended to sell only wine temporarily at any wine festival or a festival, need not apply for registration of premises.”.

**6.** In rule 48D of the principal Rules, the following proviso shall be added, namely :—

"Provided that, for any premises not registered under the proviso to rule 48A, may apply for temporary licence in their behalf, for every such wine festival or festival.".

**7.** In Form F.L.A-IF appended to the principal Rules, in para 3, after the entry at Sr. No. (d), the following entry shall be added, namely :—

"(e) Wine Festival Wine Tasting and Appreciation Event."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.